**मुख्य अभियंता,**
जलविज्ञान व धरण सुरक्षितता
सीडीओ बिल्डींगच्या मागे,
दिंडोरी रोड , नाशिक - ४२२००४
**दूरध्वनी** :०२५३-२५३०२२७

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**जलसंपदा विभाग**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**Chief Engineer,**
Hydrology & Dam Safety
Behind C.D.O. Building,
Dindori Road,
Nashik — ४२२००४
**Ph.No. :** ०२५३-२५३०२२७

**Web:** www.mahahp.gov.in **Email:** cehpswnasik@gmail.com / cehp.nashikwrd@maharashtra.gov.in

**फक्त ई-मेलद्वारे**

जा.क्र.मुअ/जवधसु/तांशा-६/(१४/२०२२)/२३६७/सन २०२२ दिनांक:- २१/११/२०२२

**प्रति,**

मुख्य अभियंता,
जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश,
मुंबई-४००००१.

**विषय :- Request for allocation of water to Proposed Bhavali Pumped Storage Project (1500 MW) of JSW Energy limited.**

**संदर्भ** :-१) शासन पत्र संकिर्ण-२००८/१६०४/(४६४/२००८)/जसंअ, दि. २७/०५/२००९.
२) शासन पत्र क्रं. जविप्र २०२१/ (प्र.क्र.७४/२१)/जवि, दिनांक - ०४/१०/२०२१.
३) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई या कार्यालयाचे पत्र जा.क्र.मुअ/ जसंविकोप्र/पाऊप्र/तां-५/२७०१, दिनांक - ०६/०७/२०२२.
४) या कार्यालयाचे मा. सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग मंत्रालय यांना उद्देशून पत्र जा.क्र.मुअ/जवधसु/तांशा-६/(१४/२०२२)/१८५०/सन २०२२, दि. २३/०८/२०२२.
५) शासन पत्र संकिर्ण-२००८/(४६४/२००८)/जसंअ, दि. १४/१०/२०२२.
६) शासन पत्र जा.क्र. जविप्र २०२१/(प्र.क्र. ७४/२१) जवि, दि. २१.१०.२०२२.

उपरोक्त संदर्भ पत्र क्र. २ अन्वये आपले कार्यालयाने विषयांकित प्रकल्पास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळणेबाबतचा प्रस्ताव शिफारशी सह सादर केलेला आहे.

संदर्भिय शासन पत्र क्र. १ नुसार खाजगी संस्थांना पाणी उपलब्धतेचे निष्कर्ष निर्गमित करण्यापुर्वी त्या अभ्यासांना शासनाची मान्यता घेण्यात यावी असे निर्देश होते. या अनुषंगाने विषयांकित प्रकल्पाची संकल्पन टिप्पणी शासन मान्यतेसाठी या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. ४ अन्वये सादर करण्यात आलेली होती. तथापि दि. १४.१०.२०२२ रोजीच्या संदर्भिय शासन पत्र क्र. ५ अन्वये मुद्दा क्र. ३ मध्ये "अनुज्ञेय शिल्लक पाण्यापैकी किती पाणी/प्रस्तावित पाणी प्रत्यक्षात प्रस्तावित प्रकल्पाच्या ठिकाणी उपलब्ध आहे किंवा कसे याबाबत पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता, नाशिक यांनी जलशास्त्रीय अभ्यास करुन त्याआधारे देणे अपेक्षित आहे. मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता, नाशिक हे जलशास्त्रीय अभ्यासासाठी सक्षम कार्यालय असून व त्यासाठी शासनाने प्राधिकृत केलेले असल्याने परत या अभ्यासास शासनाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही" असे नमूद आहे.

त्यानुसार संदर्भिय शासन पत्र क्र. ६ अन्वये शासनाने खाजगी संस्थांकडून पाणी उपलब्धता मागणी प्रस्तावाबाबत करावयाच्या कार्यावाही संदर्भात जलसंपदा विभाग, जसंअ कार्यासनाने दिनांक १४/१०/२०२२

रोजीच्या पत्रान्वये (संदर्भ पत्र क्र. ५ ) अभिप्राय दिले असून,सदर अभिप्रायास अनुसरुन पुढिल उचित कार्यवाही आपल्या स्तरावार त्वरीत करण्यात यावी असे कळविले आहे.

या अनुषंगाने या कार्यालयाने पाणी उपलब्धता प्रमाणपत्र क्र. WFR/Ulhas/894,Dated- 21/11/2022 अन्वये विषयांकित प्रकल्पास **०.९९१ द.ल.घ.मी.** चे प्रमाणपत्र जा. क्र. CE/H&DS/TS-6/(14/2022)/2350 /2022, दि. 21/11/2022 प्रदान केलेले आहे. सोबत सदर प्रमाणपत्र व संकल्पन टिपणी जोडण्यात आलेली आहे.

प्रस्तावित प्रकल्पाचा समावेश राज्य एकात्मिक जल आराखड्यात (ISWP) करण्याची जबाबदारी क्षेत्रिय मुख्य अभियंता यांची राहील.

हे आपले माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषीत.

सोबत —वरीलप्रमाणे

***स्थळ प्रत मा. मु.अ. यांनी मान्य केली आहे.***

**(अ. अ. पंडित)**
**सहायक मुख्य अभियंता**
**जलविज्ञान व धरण सुरक्षितता**
**नाशिक.**

**प्रत**:-मा. सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
**(लक्षवेध- न.गौ. बसेर, उपसचिव (जवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई)** सविनय
**प्रत**:-मा. कार्यकारी संचालक, कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांना माहितीस्तव सादर.
**प्रत**:-अधीक्षक अभियंता, आधार सामग्री पृथ:करण मंडळ, नाशिक यांना माहितीसाठी.
**सोबत**: वरीलप्रमाणे.
**प्रत**:- JSW Neo Energy Ltd, JSW Centre, Bandra Kurla Complex, Mumbai-४०००५१.
D.A.-Design Note.

d:\ts 6 sbc\wac\jsw energy\jsw ltr.doc